**प्रेस नोट** **दिनांक १३/०४/२०१९**

## स्वारगेट पोलीस स्टेशन पुणे

## रिक्षामध्ये राहीलेली बॅग परत दिलेबाबत

दि.१३/०४/२०१९ रोजी एक जेष्ठ नागरिक वय-७१ वर्षे, रा.दक्षिण शिवाजीनगर, डीमार्ट जवळ, १०० फुटीरोड, सांगली हे पुणे स्टेशन ते स्वारगेट प्रवास करीत होते. ते स्वारगेट येथे ते रिक्षा मधुन उतरले. त्यावेळेस त्यांची वैद्यकीय उपाराची कागदपत्रे असलेली व कपड्याचीं बॅग रिक्षात विसरली.

सदर ॲटो रिक्षा वरील चालक नामे राजेश सुलाखे, वय-४५ वर्षे, रा.बिबवेवाडी, पुणे यांनी सदरची बॅग स्वारगेट पोलीस स्टेशन येथे आणुन जमा केली. सदर बॅग मध्ये मिळालेल्या कागदपत्रे यावरुन जेष्ठ नागरिक वय-७१ वर्षे, रा. सांगली यांचा पोलीस नाईक २५५३ गुरव व पोहवा ७९० पठाण यांनी शोध घेऊन त्यांना त्यांची महत्वाची वैद्यकीय कागदपत्रे व कपडे असलेली बॅग त्यांचे ताब्यात दिली. त्यावेळेस जेष्ठ नागरिक वय-७१ वर्षे, रा.दक्षिण सांगली यांनी पोलीसांचे आभार मानले.